सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

(सुधारित)



पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद-२०००

(सुधारित)

## पर्यावरण विभाग (खुद्द) व
## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

MAHARASHTRA


नवीन प्रशासन भवन, १५वा मजला
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-३२


********

**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (२२) मधील तरतुदीनुसार**

वाय ५७५—१

# नागरिकांची सनद

## (सिटिझन चार्टर)

जनतेची कामे अधिक कार्यक्षमतेने व उत्तम प्रकारे पार पाडून शासनाच्या दैनंदिन कामात पारदर्शकता आणणे या शासनाच्या धोरणास अनुसरुन पर्यावरण विभागाने नागरिकांची सनद या उपक्रमाद्वारे पर्यावरण विभागाच्या योजना व त्यांची अंमलबजावणीची माहिती त्याचप्रमाणे विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणाचा समतोल व प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण याबाबत उपाययोजनांची माहिती जनतेसमोर मांडण्याचा संकल्प केला आहे.

पर्यावरण विभागाची सनद गठीत समितीची मान्यता घेऊन 'नागरीकांची सनद-२०००' यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०९.२०११ च्या परिपत्रकानुसार नागरिकांची सनद प्रसिद्ध करुन बराच कालावधी होऊन गेल्याने नागरीकांच्या सनदेत नव्याने काही योजना, शासन निर्णय व राज्य शासनाने पारित केलेले नियम / अधिनियम, इत्यादी सारांश स्वरुपात समाविष्ठ करण्यात आला आहे. विभागातील अधिकारी वर्गाची नावे, पदनाम व दुरध्वनी क्रमांक तसेच माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीकरिता सहायक माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यांचा तपशिल त्याचप्रमाणे पर्यावरण विभागाच्या वेबसाईटचाही नागरिकांच्या सनदेत समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील औद्योगिकदृष्टीने पुढारलेले राज्य असून, राज्यातील बहुतेक नागरी वस्ती बृहन्मुंबई प्राधिकरण व दहा-अ वर्ग शहरामध्ये एकवटली आहे. वाढत्या कारखान्यांमुळे व शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून परिणामी प्रदुषणामुळे मानवी जिवीतास हानीकारक असलेले म्हणजे पटकी, विषमज्वर, काविळ, दमा, श्वसनाचे रोग, मानसिक रोग, इत्यादी आजारांना तोंड द्यावे लागत आहे. एवढेच नव्हे तर प्रदुषणामुळे शहरातील जलचर, वनचर, पशुपक्षी व वनस्पती यांनाही हानी पोहचत आहे. याकरिता पर्यावरणाचा समतोल राखून प्रदुषण प्रतिबंध करुन नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पर्यावरण विभागाची व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची आहे.

**'पर्यावरण विभागाची व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची योजनांची पर्यावरण विषयक सुधारीत माहिती दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या विभागाच्या कार्यक्रम अंदाजप्रकात दर्शविण्यात येते.'**

# १. पर्यावरण विभाग(खुद्द), मंत्रालय

# 1. Environment Department, Manatralaya.

प्रास्ताविकः

नगर विकास विभागातून मंत्रालय पातळीवर स्वतंत्र पर्यावरण विभाग वेगळा करुन दिनांक ०१/०५/१९८५ पासून अस्तित्वात आला आहे.

सचिव (पर्यावरण) यांना त्यांच्या प्रशासकीय कामात दोन उपसचिव, एक अवर सचिव व एक कक्ष अधिकारी मदत करतात. विभागातील तांत्रिक कामात सचिव (पर्या.) यांना मदत करण्यासाठी संचालक (पर्या.), शास्त्रज्ञ श्रेणी-१ व शास्त्रज्ञ श्रेणी-२ हे अधिकारी आहेत.

विभागाचे काम सर्वसाधारण पर्यावरण संरक्षण हे आहे. यापैकी जल व वायू प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करुन घेतले असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामावर मंडळाच्या कामावर मंडळाचे अध्यक्ष, सदस्य सचिव आणि इतर मंडळाचे सदस्य ह्यांचे नियंत्रण असून मंडळ पर्यावरण विभागाच्या अखत्यारित काम करते.

---

## पर्यावरण विभाग

(१) महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक औद्योगिक दृष्टीने पुढारलेले राज्य असून या राज्यात मोठ्या प्रमाणावर लहान मोठे व मध्यम उद्योग आहेत. राज्यात सर्वात जास्त कामगार आहेत. महाराष्ट्रातील शहरी भागात जास्त लोकवस्ती एकवटली असून (२.५) कोटी त्यापैकी ७० टक्के नागरी वस्ती बृहन्मुंबई प्राधिकरण व १०-अ वर्ग शहरात एकवटली आहे. मुंबई प्राधिकरणात जास्त प्रमाणात व्यापारीकरण व औद्योगिकदृष्ट्या अग्रस्थानी आहे. महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येच्या ४५ टक्के लोकसंख्या मुंबई प्राधिकरण क्षेत्रात एकवटली आहे. वाढत्या कारखान्यामुळे आणि शहरीकरणामुळे मुंबई प्राधिकरण भागात वार्षिक ४.७ टक्के लोकसंख्या वाढत आहे. यामुळे पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होत आहे.

## २. सी आर झेड प्राधिकरण

केंद्र सरकारने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अंतर्गत सागरतटीय विनियमन अधिसूचना (CRZ NOTIFICATION) १९ फेब्रुवारी १९९१ रोजी पारीत केली होती. आता सदर अधिसूचना रद्द करुन केंद्रशासनाने नव्याने पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत क्र. S.O.19 (क), दि.०६ जानेवारी, २०११ अन्वये नवीन C.R.Z. अधिसूचना पारित केली आहे. या अधिसूचनेनुसार प्रत्येक राज्याने सागर तटीय व्यवस्थापन आराखडा (Coastal Notification) तयार करुन त्यास केंद्र सरकारची मंजूरी घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने कोस्टल रेग्युलेशन झोनच्या अधिसूचनांची योग्य त-हेने अंमलबजावणी करण्यासाठी प्रधान सचिव / सचिव (पर्या.) यांच्या अध्यक्षतेखाली बारा जणांचे एक प्राधिकरण नियुक्त केले आहे. पर्यावरण विभागातील उपसचिव किंवा उपसचिव पदाच्या समकक्ष पदावरील अधिकारी हे या प्राधिकरणाचे सदस्य सचिव आहेत. कोस्टल झोन अधिनियमांच्या सूचनांचा भंग झाल्यास या प्राधिकरणामार्फत संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

३. जैविक वैद्यकीय कचरा

रुग्णालये, पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी, रासायनिक प्रयोगशाळा इत्यादी मधून निघणा-या घनकच-यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करणे पर्यावरणदृष्ट्या आवश्यक असते. याबाबत पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत बायोमेडीकल वेस्ट अधिसूचना दिनांक २० जुलै, १९९८ रोजी जारी केली आहे. या अधिसूचनेतंर्गत अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे सर्व रुग्णालये, प्रयोगशाळा यांमधून निघणारा जैविक कचरा हा शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करुन व त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही संबंधीत रुग्णालये, प्रयोगशाळा यांच्यावर आहे. या अधिसूचनेंतर्गत परवानगी देण्याचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना शासनातर्फे देण्यात आलेले आहेत. यासाठी शासकीय स्तरावर विभागाच्या शासन निर्णय क्र. Bnw २००६/प्र.क्र.८२/तां.क.२, दिनांक ३१ डिसेंबर २००६ अन्वये बायोमेडीकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ च्या अंतर्गत सचिव (पर्या.) यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची स्थापना केली आहे.

(अ) बायोमेडीकल वेस्टसंबंधी अधिसूचनेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत येणा-या बहुतांश रुग्णालये, नर्सिंग होम व दवाखाने या सर्व संस्था महानगरपालिकेने बांधलेल्या C.W.T.D. प्रकल्पाचे सभासद होऊन त्यांच्यामार्फत जैविक कच-याची विल्हेवाट लावीत आहेत.

(ब) त्याचप्रमाणे पुणे येथे महापालिकेने बांधलेल्या C.W.T.D. येथे त्यांच्या अंतर्गत येणा-याची बहुतांश रुग्णालये अथवा अन्य सदस्य त्या यंत्रणेचा उपयोग करीत आहेत.

(क) या व्यतिरिक्त सांगली, कल्याण येथे अशा प्रकारच्या C.W.T.D.& Center उभारणीचे प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाले असून अशा संस्थांना अथोरायझेशन देण्यात आले आहेत.

(ड) मुंबई, पुणे, कोल्हापूर वगळता उर्वरित महाराष्ट्रामध्ये नगरपालिक/नगरपरिषद यांच्या हद्दीमध्ये येणा-या हॉस्पिटल इत्यादिकरिता योग्य जागा उपलब्ध करुन देण्याविषयी संबंधितांकडे पाठपुरावा चालू आहे व त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळत आहे.

(इ) महाराष्ट्र शासन संचलित Civil Hospital, General Hospital, ESIS Hospital इ. बाबत आरोग्य विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(फ) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाकडून तसेच प्रादेशिक कार्यालयाकडून याबाबत अमंलबजावणीकरिता वैद्यकीय व्यवसायाशी निगडीत विविध संस्था तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, पालिका आयुक्त इत्यादीकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येतो.

बायोमेडीकल वेस्ट (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ मधील नियम क्रमांक ८ (३) नुसार पर्यावरण विभागाच्या दिनांक १० एप्रिल, २००३ च्या शासन निर्णयान्वये बायोमेडीकल वेस्ट (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ च्या अंतर्गत अॅथोराझेशनसाठी सुधारीत फी आकारण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ च्या अंतर्गत अॅपिलेट प्रधिकरण गठीत करण्याबाबत दिनांक ३ ऑक्टोबर, २००३ अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

## ४. सामायिक सांडपाणी संयंत्रणा योजना -

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या रासायनिक कारखान्याच्या औद्योगिक क्षेत्रणाद्धे सांडपाणी प्रक्रिया व विल्हेवाट परिणामकारकरित्या होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यात सामायिक सांडपाणी संयंत्र योजना, खासकरुन रासायनिक कारखान्याच्या औद्योगिक क्षेत्रासाठी हाती घेण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत २० टक्के अनुदान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ५ टक्के अनुदान महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व उर्वरित रक्कम कारखान्यांनी उभारवयाची आहे. या योजनेअंतर्गत बदलापूर, डोंबिवली, महाड, लोटे, रोहा, पाताळगंगा व बुटीबोरी येथील औद्योगिक क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. यापूर्वी तारापूर, डोंबिवली, तळोजा, ठाणे-बेलापूर, अंबरनाथ व जयसिंगपूर येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये सामायिक सांडपाणी संयंत्र योजना यापूर्वीच कार्यरत करण्यात आलेली आहे.

## ५. राष्ट्रीय हरित सेना योजना -

राष्ट्रीय हरीत सेना ही १०० टक्के केंद्र पुरुस्कृत महत्वाकांक्षी योजना असून शालेय विद्यार्थ्यांद्वारे त्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

ही योजना सन २००२ पासून सुरु झाली असून महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येकी २५० इको क्लबनिर्माण करण्यात आले आहेत. प्रत्येक इको क्लबमध्ये ५० विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यात येते. आतापर्यंत राज्या ८८९८ इको क्लबस् स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये सुमारे ४,४२,५०० विद्यार्थी सहभागी आहेत. या इको क्लबस् मार्फत स्मृतीवन विकास, बीज भंडार (Seed Bank) फटाक्यांचे दुष्परिणाम तसेच ध्वनी व जल प्रदूषण इत्यादी बाबत विविध लघु प्रकल्प राबविण्यात येतात. ह्यासाठी प्रत्येक इको क्लबला केंद्र शासनद्वारे रु.२,५०० अनुदान देण्यात येते.

## ६. जिल्हा पर्यावरण समिती -

जिल्हा पर्यावरण संवर्धनात व संरक्षणात स्थानिक यंत्रणेच्या व जनतेच्या जनसहभागाचे महत्व लक्षात घेऊन केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने देशातील प्रत्येक राज्यात प्रदुषण नियंत्रण मंडळाव्यतिरिक्त जिल्हा पातळीवर जिल्हा पर्यावरण समिती गठित करण्याबाबत निदेश त्यांच्या दि.३० डिसेंबर १९८८ च्या पत्राद्वारे दिलेले आहेत. ही समिती गठित करण्यामागील केंद्र शासनाचा मुख्य हेतू हा, जिल्ह्यातील पर्यावरणाचे संरक्षण करणे असा आहे. ही समिती स्थानिक पर्यावरणाशी संबंधी बाबींवर लक्ष केंद्रीत करेल. जनसहभागाने स्थानिक पर्यावरणाशी संबंधित बाबींवर लक्ष केंद्रीत करेल. जनसहभागाने स्थानिक पर्यावरणाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे, जनजागृती करणे, जिल्ह्यातील विविध नैसर्गिक संसाधनांचे सर्वेक्षण करुन त्या संसाधनांच्या संवर्धनासाठी शासनास शिफारसी करणे, तसेच शासनास जिल्ह्याच्या पर्यावरण संवर्धनासाठी योग्य त्या शिफारशी करणे / सल्ला देणे, ही समिती केवळ सल्लागार समिती म्हणून कार्य करेल किंवा राज्य शासनाने ठरविल्यास जिल्हा प्रशासनामध्ये सुद्धा औपचारिकरित्या पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनिक कार्य करु शकेल.

जिल्हा पर्यावरण समिती शासन निर्णय जावक क्रमांक जिपस-२०१०/प्र.क्र.१९/तां.क.४, दिनांक १८ मे २०१० अन्वये पुनर्रचित व पुनर्गठित करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | .. अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | .. सदस्य |
| ३. | जिल्हा उद्योग अधिकारी | .. सदस्य |
| ४. | जिल्हा कृषी अधिकारी | .. सदस्य |
| ५. | जिल्हा आरोग्य अधिकारी | .. सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | .. सदस्य |
| ७. | कार्यकारी, अभियंत, सार्वजनिक बांधकाम विभाग | .. सदस्य |
| ८. | जिल्हा जनसंपर्क व माहिती अधिकारी | .. सदस्य |
| ९. | जिल्हा वन अधिकार | .. सदस्य |
| १०. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | .. सदस्य |
| ११. | अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ २ (प्रतिनिधी) | .. सदस्य |
| १२. | अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या जिल्ह्यातील अशासकीय सेवाभावी संस्थेचे २ प्रतिनिधी | .. सदस्य |
| १३. | जिल्ह्यातील सर्व आमदार | .. सदस्य |
| १४. | उप जिल्हाधिकारी | .. सदस्य सचिव |

शासकीय सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा समितीमधील सदस्यांचा कालावधी हा दोन वर्षासाठी असतो. दोन वर्षानंतर समितीचे अध्यक्ष त्यांच्या स्तरावर सदस्यांचे नवीन नामनिर्देशन करतात व तसे शासनास कळवितात.

अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास ते जिल्ह्यातील इतर लोकप्रतिनिधींना व इतर शासकीय अधिका-यांना स्थानिक विषयाच्या निकडीनुसार आमंत्रित करु शकतात.

**(अ) समितीचे कामकाज व कार्यकक्षा**

१. शासनाने निश्चित करुन दिलेल्या रुपरेषेप्रमाणे दरवर्षी जिल्हा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करुन शासनास सादर करणे.

२. जिल्ह्यातील पर्यावरणाचा -हास झालेल्या नैसर्गिक संसाधनांचे सर्वेक्षण करुन अशा संसाधनांच्या संवर्धनासाठी शासनास शिफारस करणे व शासनाच्या मान्यतेने उपाययोजनांच्या अमंलबजावणीसाठी संनियंत्रण करणे.

३. शाश्वत विसासाचे ध्येय डोळ्यासमोर देऊन जिल्हा पर्यावरण कृती आराखडा तयार करुन त्याची शासनास शिफारस करणे व शासनाच्या मान्यतेने त्याची अंमलबजावणी करणे.

४. जिल्हा स्तरावर पर्यावरण दिन, वसुंधरा दिन, जलसाक्षरता दिवस, ओझोन संरक्षण दिवस, वेट लॅण्ड कन्झर्व्हेशन दिवस, वृक्षारोपण मोहीम, प्लॅस्टिक निर्मूलन मोहीम, प्लॅस्टीक पिशव्यांच्या बंदीबाबत जनजागृती, शाळा-कॉलेजामध्ये पर्यावरण शिक्षण व जनजागृती स्पर्धा व कार्यक्रम इत्यादी राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.

५. पर्यावरण विभागामार्फत राज्य स्तरावरील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या योजनेच्या योग्य त्या अंमलबजावणीसाठी संनियंत्रण यंत्रणा म्हणून सदर समिती कार्य करेल.

६. समितीचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार राज्य शासनाने व केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने पात्र ठरविलेल्या राज्यातील प्रयोगशाळांचे किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व मंडळाच्या प्रयोगशाळांचा उपयोग करु शकतील.

७. जल्ह्यात नव्याने प्रस्थापित होणा-या विकास प्रकल्पांचा पर्यावरणावर होणारा आघात कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना सुचवून त्यांचा अंतर्भाव पर्यावरण अहवाल मुल्यांकन आघात मूल्यांकन अहवालामध्ये करुन घेणे.

८. सद्यःस्थिती अस्तित्वात असलेल्या विकास योजना / प्रकल्पांमुळे होणा-या पर्यावरण -हासांवर उपाययोजना शासनास सूचविणे व शासनाच्या निर्देशानुसार त्यावर अंमलबजावणी करणे.

९. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना क्र.एसओ-३९४ (ई), दिनांक १६ एप्रिल, १९८७ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले अधिकार जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा स्तरावर पर्यावरण संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आवश्यकतेनुसार वापरतील. तसेच पर्यावरण -हासास कारणीभूत ठरत असलेल्या/ठरणा-या घटकांवर/संस्थावर या कायद्यान्वये प्राप्त अधिकारांनुसार, समितीचे अध्यक्ष कारवाई करतील किंवा कारवाई करण्यासाठी शासनाच्या पर्यावरण विभागास शिफारस करतील.

१०. पर्यावरण विभागामार्फत राज्य स्तरावरील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या योजनेच्या योग्य त्या अंमलबजावणीसाठी संनियंत्रण यंत्रणा म्हणून देखील सदर समिती कार्य करेल.

११. सदर समितीची बैठक कमीत कमी तीन महिन्यांतून एकदा होईल व बैठकीचे इतिवृत्त पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल.

१२. समिती पर्यावरण -हासाबाबत प्राप्त होणा-या तक्रारींची स्थानिक पातळीवर त्वरीत दखल घेईल व त्यासाठी आवश्यक ती कारवाई सुध्दा करेल.

(ब) पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीवा रुजवून त्या समृद्ध करण्यासाठी विशेष इको-क्लब मार्फत अंमलबजावणी :—

देशातील डोंगराळ प्रदेशाच्या विसासास चालना देण्यासाठी राष्ट्रीय विकास मंडळाच्या शिफारशीनुसार १९७४-७५ या वर्षापासून महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ व गोवा या राज्यामध्ये पश्चिम घाट विकासाचा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. ज्या तालुक्यातील किमान २० टक्के क्षेत्र ६०० मीटर उंचीवर आहे अशा क्षेत्राचा पश्चिम घाट क्षेत्रात समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्याच्या १२ जिल्ह्यातील ६३ पश्चिम घाट विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमातंर्गत शालेय विद्यार्थ्यांमध्ये तालुक्यांमध्ये विषयक जाणिवा रुजवून त्या समृद्ध करण्यासाठी पश्चिम घाट क्षेत्रामध्ये विशेष इको-क्लब मार्फत अंमलबजावणी करण्यास शा.नि.क्र. पद्यावि-२०१०/प्र.क्र.३१/२०१०/ तां.क.४, दिनांक २८.१०.२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

## ७. सरदार सरोवर प्रकल्प

सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत पर्यावरण समन्वय कक्षाची स्थापना जुलै, २००७ मध्ये करण्यात आलेली आहे. सरदार सरोवर प्रकल्पाच्या विकास कामांतर्गत पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या उपाययोजनांच्या अंमलबजावणीत शासनाचे विविध विभाग सहभागी असून या विभागांमध्ये समन्वय साधून पर्यावरण विषयक बाबींची वेळेवर अंमलबजावणी करण्यासाठी पर्यावरण विभाग कार्यशिल आहे. प्रामुख्याने यामध्ये कॅचमेंट एरिया ट्रीटमेंट पर्यायी वनक्षेत्र घोषित करून विकसित करणे, बुडीत क्षेत्रातील वृक्षतोड, जलाशयात मत्स्य व्यवसाय संगोपन व वाढ, महाराष्ट्रातील सरोवराच्या बाधित क्षेत्रातील लोकांना आरोग्य सेवा पुरविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

याबाबत झालेल्या प्रगतीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

(१) कॅचमेंट एरिया ट्रिटमेंटच्या अंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण झाली असून त्या अंतर्गत २३२९५ हेक्टर क्षेत्रावर ट्रिटमेंट करण्यात आलेली आहे.

(२) कॅचमेंट एरिया ट्रिटमेंटच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत २१६५९ हेक्टर क्षेत्रावर आतापर्यंत ट्रिटमेंट करण्यात आलेली आहे.

(३) कॅचमेंट एरिया ट्रिटमेंटच्या कामाचा आढावा घेण्यासाठी त्या भागात गाळमापक संयंत्रे बसविण्यात आली आहेत.

(४) पर्यायी वनलागवड २३५७६.२९ हे एवढ्या भागात पूर्ण झाली आहे. तसेच १०५८२.६९ हेक्टर एवढा भाग संरक्षित वन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

(५) सरदार सरोवर धरणाच्या बुडीत क्षेत्रातील १९७६.२७ हे क्षेत्रापैकी १९४९.२७ हे क्षेत्रातील झाडोरा काढण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(६) सरदार सरोवरच्या महाराष्ट्राकडील बाजूस २५०० हेक्टर भागावर वृक्ष लागवड करुन बफर झोन तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(७) धडगाव व अक्कलकुवा येथील डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी दोन तरंगत्या दवाखान्यांची सोय करण्यात आली आहे. तसेच इतर आरोग्यसेवा पुरविण्यात येते.

## ८. इको सेन्सिटीव्ह क्षेत्र

महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण दि.१७.०१.२०११ च्या केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील माथेरान हे थंड हवेचे ठिकाण केंद्र शासनाच्या दिनांक ०४.०२.२००३ च्या आदेशाद्वारे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

या क्षेत्रांमध्ये पर्यावरण विषयक बाबींचे नियमन करण्यासाठी उच्चस्तरीय संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. नगर विकास विभागामार्फत या क्षेत्रातील विकासाचे नियमन करण्यासाठी झोनल व सब-झोनल मास्टर प्लान तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या क्षेत्रासाठी पर्यटन आराखडा तयार करण्याचे काम पर्यटन विभागामार्फत करण्यात येत आहे.

## ९. राष्ट्रीय नदी कृती योजना-

(१) राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत देशातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धीकरण करण्याकरिता केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नदी कृती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्रातील नद्यांवरील कराड व सांगली (कृष्णा) आणि नाशिक, नांदेड व त्र्यंबकेश्वर (गोदावरी) व कोल्हापूर (पंचगंगा), प्रकाशा (तापी) या सात शहरांचा समावेश केला आहे.

(२) नद्यांचे प्रदूषण मुख्यत्वे करुन शहरी सांडपाण्यामुळे होत असल्याने नदीच्या काठावरील शहरांचे सांडपाणी योग्य प्रकारे प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. त्याशिवाय या योजनेत नदी घाट विकास, स्मशानभूमी, स्वच्छतागृहे व नदीकाठी वनीकरणे व सुशोभीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

(३) राष्ट्रीय नदी कृती योजना ही केंद्र शासन पुरुस्कृत योजना असून दहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार यातील ७० टक्के खर्च केंद्र व ३० टक्के राज्य शासन/ संबंधीत महानगरपालिका यांनी करावयाचा आहे. उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

## १०. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना

राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना ही केंद्र शासन पुरस्कृत येजना असून त्यात स्थानिक यंत्रणेचा ३० टक्के सहभाग आहे.

शहरी व निमशहरी भागातील प्रदुषित व पर्यावरणीयदृष्टट्या दर्जा खालावलेल्या तलावांचे संरक्षण संवर्धन करणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे.

यायाजेनेंतर्गत महाराष्ट्रातील १४ तलावांच्या पर्यावरणीय संवर्धनाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

## ११. मुंबई शहराचा पर्यावरण विषयक कृती आराखडा

केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने मुंबई शहरातील व परिसरातील वाढते प्रदूषण लक्षात घेता पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अनुसार निरनिराळ्या पर्यावरण विषयक बाबींच्या आधारावर मुंबई प्रदेशसाठी पर्यावरण विशयक कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्यामध्ये ( १ ) वाहनांपासून व कारखन्यांपासून होणारे प्रदूषण नियंत्रण करणे (२) वाहनाची नियमीत तपासणी करणे, प्रदूषणरहित इंधनाचा वापर करणे, वाहनांसाठी कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (CNG) चा वापर करण्यास प्रोत्साहीत करणे. (३) उद्योगापासून धोकादायक व घातक घनकच-याचे व्यवस्थसपन च विल्हेवाट करणे (४) रहिवासी क्षेत्रात ध्वनीचे प्रदूषण रोखणे व संनियंत्रण करण्यासाठी, मलशुद्धीकरणकेंद्र बांधणे व कार्यान्वित करणे. संपूर्ण शहरी भागासाठी मलनिःसारण योजना राबविणे (६) घनकचरा जमा करणे, वाहून नेणे व विल्हेवाट लावणे, घरोघरी जाऊन कचरा जमा करणे व वाहतूक करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था यांनी योजना योजना राबविणे , कचरा जमा करण्याच्या व वाहतूक पद्धतीचे आधुनिकीकरण व कंपोस्टिंग व्हर्मीकल्चला प्रोत्साहन देणे.

वर नमूद केलेल्या निरनिराळ्या पर्यावरण विषयक बाबींचा अभ्यास करून योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मुंबई प्रदेशातील निरनिराळ्या संस्था कार्यरत आहे. या संस्थांकडून वरील कामांमध्ये योग्य तो सहभाग घेऊन मुंबईतील पर्यावरण सुधारण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सध्या मुंबईतील महानगरपालिकेतील ६ ठिकाणी ( वरळी, खार, अंधेरी, मरोळ, टिळकनगर आणि बोरीवली)हवेचे सर्वेक्षण मानवचलित आणि ३ ठिकाणी (माहिम, वडाळा व अंधेरी) वाहतूक जोडमार्गावर स्वयंचलित वायुप्रदूषण सर्वेक्षण वाहनाद्वारे केले जाते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबईतील सायन, मुलुंड इतयादी ठिकाणी स्वयंचलित वाहनाद्वारे हवेच्या गुणवत्तेचे सर्वेक्षण केले जाते.

स्वयंचलित हवा गुणवत्त संनियंत्रण केंद्रे स्थापण्याबाबत, मुंबई महानगर क्षेत्रामध्ये समाविष्ट महानगरपालिका क्षेत्रात स्वयंचलित हवा गुणवत्ता संनियंत्रण स्थापण्याबाबत उच्च न्यालयाच्या आदेशानुसार शासनाने समिती नियुक्त केली होती. या समितीच्या शिफारशीनुसार मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ५, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १, ठाणे व कल्याण महानगरपालिका प्रत्येकी ३, उल्हासनगर महापालिका व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात प्रत्येकी १ अशी एकूण १४ स्वयंचलित हवा गुणवत्ता संनियंत्रण केंद्रे स्थापन करण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. ही १४ केंद्रे स्थापन करण्यासाठी रू.१०५२.५०लाख एवढा खर्च येणार असून या खर्चापैकी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ५० टक्के, नगर विकास विभाग २५ टक्के व संबंधित महानगरपालिका/नगरपालिका यांनी २५ टक्के निधी उपलब्ध करून द्यावयाचा आहे.याबाबतचा शासन निर्णयदिनांक २७ जुलै, २००१रोजी नगर विकास विभागने निर्गमित केला आहे.

## १२. झोनिंग ॲटलास :—

औद्योगिक क्षेत्रासाठी नियोजित जागेचे पुनर्विलोकन करण्यासाठी त्या औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण व संभावित अपघातांचे मुल्यनिर्धारण करण्यात येते. ती जागा योग्य आहे किंवा नाही ते जाणून घेण्यासाठी झोनिंग ॲटलासचे प्रयोजन करण्यात आले आहे.

औद्योगिक क्षेत्रासाठी जागा नियोजित करण्यासाठी झोनिंग ॲटलास तयार करण्याचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेतः-

(१) औद्योगिकरणासाठी क्षेत्रनिहाय वर्गीकरणे करणे.

(२) औद्योगिकरण करण्यासाठी निश्चित स्थानांची निवड करणे.

(३) ही योजना रत्नागिरी व औरंगाबाद जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे.

औद्योगिक क्षेत्रासाठी नियोजित जागा निश्चित करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये काही जिल्हे झोनिंग ॲटलास तयार करण्यासाठी केंद्रिय प्रदुषण प्रमुख शहरे, औद्योगिक क्षेत्रे, पाण्याचे स्त्रोत इत्यादीची सखोल माहिती घेऊन औद्योगक विकासासाठी जागा नियोजित करण्यात येतात. सदर योजना १९९६ पासून चालू असून महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी, पुणे व औरंगाबाद जिल्ह्याचा झोनिंग ॲटलास तयार झालेला आहे. राज्यातील रायगड, सोलापूर व नाशिक या जिल्ह्यांसाठी झोनिंग ॲटलास तयार करण्याच प्रस्ताव आहे. तसेच याच योजनेंतर्गत कल्याण, डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रासाठी व महाड येथील औद्योगिक वसाहतीसाठी पर्यावरण व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे प्रस्तावित आहे. या कामासाठी सन २००७-०८ या वर्षासाठी रु.१४.१४ लाख इतका निधी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला होता.

## १३. नदी खो-यांच्या क्षेत्रामध्ये उद्योगधंदे उभारण्याबाबत धोरण :—

१. नदी काठावरील कारखाने सांडपाण्यावर अपूरी प्रक्रीया करुन किंवा प्रक्रीया न करता सांडपाणी नदीत सोडतात यामुळे नदीचे प्रदुषण होत असते. याकरिता शासनाने आता दिनांक १३ जुलै, २००९ अन्वये निर्णय घेतला आहे. त्यानुसार नदीच्या गुणवत्तेनुसार अ-१, अ-२, अ-३ व अ-४ या चार वर्गामध्ये नद्यांच्या त्या क्षेत्रातील अपेक्षित पाणी वापरासंबंधी विचार करुन वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

२. अ-१ या वर्गामध्ये नदीच्या नियंत्रक पुररेषेपासून दोन्ही बाजूस तीन किलोमीटर पर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध राहील. त्यानंतरच्या ५ कि.मी. पर्यंतच्या क्षेत्रात हिरव्या व नारंगी संवर्गातील उद्योग उभारणे अनुज्ञेय राहील. त्यापुढील म्हणजेच ८ कि.मी. नंतरच्या क्षेत्रात कोणतेही कारखान्यांना योग्य ते प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविल्यानंतर परवानगी देता येईल. धरणाच्या बुडीत क्षेत्रात दोन्ही बाजूस ८ कि.मी. अंतरापर्यंत डोंगर क्षेत्रात कोणतीही उद्योगांना परवानगी अनुज्ञेय नाही.

३. राज्यातील सर्वसाधारण उद्योगांसाठी अ-२ वर्गीकरणामध्ये नदी किना-यापासून पहिला ५०० मीटरचा पट्टा ना-विकास क्षेत्र, त्यापुढील ५०० ते १००० मीटरच्या पट्ट्यात हरित संवर्गातील उद्योग, त्यापुढील १००० ते २००० मीटरच्या पट्ट्यामध्ये हरीत व नारंगी संवर्गातील उद्योग व तद्नंतर म्हणजे नदी किना-यापासून २००० मीटर नंतर सर्व उद्योगंना परवानगी असेल.

४. महाराष्ट्र औद्योगिक विकास क्षेत्रासाठी नदी किना-यापासून पहिला ५०० मीटरचा पट्टा ना-विकास क्षेत्र त्यापुढील ५०० ते ७५० मीटरच्या पट्ट्यात हरीत व नारंगी संवर्गातील उद्योग, तद्नंतर सर्व उद्योगांना विकास महामंडळाच्या मार्फत / माध्यमाने सांडपाणी एकत्रिकरण, सामायिक सांडपणी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट यंत्रणा असणे आवश्यक आहे.

५. अ-३ व अ-४ या दोन्ही वर्गामध्ये नदीच्या नियंत्रक पुररेषेपासून दोन्ही बाजूस अर्धा कि.मी. पर्यंतच्या क्षेत्रात उद्योग उभारण्यासाठी प्रतिबंध राहील.

६. नदीच्या पाण्याचो गुणवत्ता प्रस्तावित उपयोगासाठी राखण्यासाठी नारंगी क्षेत्रामध्ये पर्यावरण विषयक सुविधांचा विकास होण्याच्या दृष्टीने पुढील निर्णय घेण्यात आलेले आहेत.

(अ) नदी वर्गीकरण केलेल्या क्षेत्रामध्ये पुरेशी प्रक्रिया न केलेले घरगुती सांडपाणी विसर्ग यंत्रणा उभारुन कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

(ब) घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणी नद्यांच्या नियंत्रक पुररेषेच्या १०० मीटरच्या बाहेर अनुज्ञेय राहील.

(क) नदीच्या नियंत्रक पूररेषेच्या ५०० मीटरच्या बाहेर नागरी क्षेत्रातील घनकचरा विल्हेवाटीसाठी घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यासाठी परवानगी असेल.

(ड) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व नगरी घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा नद्यांच्या पुरामुळे बुडणार नाही यांची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

(ई) स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्या परिसरात असणा-या नद्या व तलाव यांच्या पाणी गुणवत्ता संवर्धनासाठी विशेष कार्यक्रम हाती घ्यावेत. जसे वाहने धुणे, घनकचरा विल्हेवाट.

## १४. ध्वनी प्रदूषण नियमन

सार्वजनिक ठिकाणी वातावरणात ध्वनीची तिव्रता वाहतूक व इतर कारणामुळे वाढत आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी ध्वनी प्रदुषण नियमन २००० लागू केलेला आहे.

या अधिनियमानुसार ध्वनी प्रदुषणाच्या दृष्टीने निरनिराळ्या क्षेत्राचे उद्योग, वाणिज्य, निवासी व शांतता झोन असे प्रभाग पाडण्यात आले असून प्रत्येक भागासाठी ध्वनीच्या पातळीचे प्रमाण ठरवून देण्यात आलेले आहे.

नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने -

१. दिनांक २१ एप्रिल, २००९ व दिनांक ७ डिसेंबर, २००९ रोजी सुधारीत शासन निर्णय काढलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे शांतता झोन जाहीर करण्यात आले आहेत.

(अ) शैक्षणिक संस्थांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र.

(ब) सर्व न्यायालयांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र.

(क) रुग्णालयांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र.

(ड) धार्मिक स्थळांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र शांतता झोन.

- सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये व ग्रामीण क्षेत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शांतता झोन त्वरित जाहीर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

२. त्याचप्रमाणे शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिपत्याखालील संस्थाच्या खाली अधिका-यांना पदनाम प्राधिकरण म्हणून जाहीर करण्यात आले आहे.

- महसूल विभागाशी संबंधित जिल्हादंडाधिकारी

- नगर विकास विभाग - महानगर पालिक आयुक्त, अतिरिक्त / उपायुक्त, नगर पालिकांचे मुख्याधिकारी,

- उच्च व तंत्र शिक्षण विभाग - प्रबंधक/पोलिस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले शासनमान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक.

- सार्वजनिक आरोग्य विभाग - अधिष्ठाता/पोलिस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले शासकीय रुग्णालयाचे अधिक्षक.

- नगर विकास विभाग - एमएमआरडीए, एमएसआरडीसी, सिडको.

- पर्यावरण विभाग - सदस्य सचिव आणि पोलिस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कोणतेही अधिकारी,

- गृह विभाग - (अ) पोलीस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी.

(ब) पोलिस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले एस.टी.महामंडळाचे अधिकारी / आगार व्यवस्थापक.

(क) पोलिस उप अधिक्षकच्या दर्जापेक्षा कमी नसलेले वाहतूक पोलिस अधिकारी.

सणांच्या वेळी फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व हवा प्रदुषण रोखण्यासाठी पर्यावरण विभागाने दि.१०.१०.२००२ च्या परिपत्रकान्वये १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज करणारे फटाक्याच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घातलेली आहे. साखळी फटाक्याच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घातलेली आहे. साखळी फटाक्यात एकुण ५०, ५० ते १०० व १०० व त्यापेक्षा जास्त फटाक्यांची साखळी असेल तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या

जागेपासून ४ मीटर अंतरापर्यंत अनुक्रमे ११५, ११० व १०५ डेसिबल एवढी असावी. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत दारुकाम व फटाके यांचा वापर करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

ध्वनिप्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००२ च्या नियम ५ च्या उपनियम ३ नुसार ध्वनिपेक्षक व ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर श्रोतगृहे, सामुहीक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज इतर ठिकणी वर्षातील विशिष्ट १५ दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहीत मर्यादा राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत करण्यास दिनांक २८ एप्रिल, २००३ च्या शासन निर्णयान्वये सूट देण्यात आली आहे.

**१५-अ, महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण)अधिनियम,२००६ :—**

सार्वजनिक नाले, रस्ते, पानथळ जमिन, जलाशय, लोकांना दिसेल अशा जागा, यामध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठविण्यास प्रतिबंध करण्यासाठी,अविघटनशील पदार्थाचा वापर विनियमित करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबधीत किंवा तदुनशंगिक बाबींच्या नियमनासाठी दिनांक २१ एप्रिल २००६ रोजी महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम क्र.१० महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. या अधिनियमांतर्गत पर्यावरणाला घातक ठरणा-या विवक्षित अविघटनशील पदार्थ इ. च्या वापरावर निर्बंध किंवा बंदी घालण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त झाले आहेत. तसेच स्थानिक प्राधिकरणाचे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने कर्तव्य निश्चित केले असून त्यानुसार अविघटनशील कचरा ठेवण्यासाठी कुंडयांची आणि तो टाकण्यासाठी विशिष्ट ठिकाणांची तरतूद करणे तसेच टाकाऊ पदार्थ गोळा करण्याची पध्दत निश्चित करणे अशा प्रकारे गोळा केलेल्या अविघटनशील कच-याचे पुनंचक्रीकरण करण्याची व्यवस्था करणे इ. बाबत नियमन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अधिनियमाच्या अनुसूचीनुसार १६ अविघटनशी पदार्थ किंवा कचरा यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**१५-ब महाराष्ट्र प्लॅस्टीक पिशवी (कॅरी बॅग) उत्पादन नियम, २००६ :–**

महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम,२००६ च्या कलम ४ (१ व २) याद्वारे प्रदान करण्यात आलेला अधिकारांचा वापर , करून दिनांक ३ मार्च, २००६ रोजी महाराष्ट्र प्लॅस्टीक पिशवी नियम प्रकाशित करण्यात आलेले आहेत. या नियमांतर्गत ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८ x १२ जाडीच्या इंचापेक्षा लहान आकाराच्या प्लॅस्टीक कॅरीबॅगजच्या वापरावर व उत्पादनावर संपूर्ण राज्यात बंदी घालण्यात आली आहे. या नियमानुसार विहीत मानकाच्या प्रत्येक प्लॅस्टीक पिशवीवर उत्पादकाचे नाव, नोंदणी क्रमांक व पिशवी जाडी मुद्रीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. अन्न पदार्थाच्या पॅकेजींगसाठी पुनर्चक्रीत प्लॅस्टीक पिशव्यांच्या वापराबाबत अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असून उत्पादनावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची आहे. या नियमांचे उल्लंघन करणा-या उत्पादक किंवा विक्रेत्यावर पहिल्या गुन्हयासाठी ५,००० दुस-या गुन्हयासाठी १०,००० व तिस-या गुन्हयासाठी २५,००० व तुरूंगवासाची शिक्षा अशी तरतुद आहे.

महानगरपालिकांचे आयुक्त,स्थानिक स्वराज्य संस्थांचे मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, तहसिलदार,सदस्य सचिव,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व विकास आयुक्त, उद्योग हे त्यांच्या संबधित क्षेत्रात या नियमांची अंमलबजावणी करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत.

**१५ क. महाराष्ट्र (महानगरपालिका क्षेत्रातील अविघटनशील घनकचरा योग्य व शास्त्रशुध्द पध्दतीने संकलन करणे, विलगीकरण करणे व विल्हेवाट करणे) नियम,२००६ :—**

महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम,२००६ च्या कलम १८(३) याद्वारे प्रधान करण्यात आलेला अधिकाराचा वापर करून दिनांक ३ मार्च २००६ रोजी महाराष्ट्र (महानगरपालिका क्षेत्रातील अविघटनशील घनकचरा योग्य व शास्त्रशुध्द पध्दतीने संकलन करणे, विलगीकरण करणे व विल्हेवाट करणे) नियम प्रकाशित करण्यात आलेले आहेत. या नियमानुसार महानगरपालिकांची अविघटनशील कचरा हाताळण्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका आपल्या प्रादेशिक क्षेत्राच्या हद्दीमध्ये, या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आणि अविघटनशील घनकचरा गोळा करणे तो वेगळा करणे, त्याची साठवण करणे, त्याची विलगीकरण करणे, तो वाहून नेणे, त्याच्यावर प्रक्रीया करणे आणि त्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे यासाठीच्या कोणत्याही पायाभूत सुविधेचा विकास करण्यासाठी जबाबदार असेल. सार्वजनिक ठिकाणांवरील कच-याची सरमिसळ होऊ नये आणि कचरा खाली सांडू नये यासाठी सार्वजनिक ठिकाणी विघटनशील व अविघटनशील कच-याकरीता वेगवेगळया रंगाच्या किमान २ स्वतंत्र कचराकुंडया ठेवतील आणि सार्वजनिक ठिकाणी या प्रयोजनासाठी ठेवलेल्या कचराकुंडया करीता ठराविक सांकेतिक रंग ठरवतील. महानगरपालिका कोणत्याही अभिकरणाच्या मदतीने प्रत्येक प्रभागामध्ये विविध ठिकाणी त्या क्षेत्रामधील कचरा निर्मितीच्या अंदाजित प्रमाणावर आणि लोकसंख्येच्या घनतेवर आधारित अविघटनशील कचरा संकलन व विलगीकरण करणारी केंद्र उभारील. या नियमानुसार महानगरपालिका गटातील सहकारी गृहनिर्माण संस्था, हॉटेल, वाणिज्यिक आस्थापना व आपआपल्या जागामध्ये निर्माण झालेली अविघटनशील व विघटनशी कचरा गोळा करण्यासाठी विहित रंगाच्या किमान दोन स्वतंत्र कचराकुंडया ठेवतील.

**१६. पर्यावरण विभाग सामर्थ्यवान होण्यासाठी तांत्रीक कक्ष निर्माण करणे.**

भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांनी पर्यावरण संरक्षणासाठी पर्यावरण विभागात तांत्रिक कक्ष तयार करण्यास मध्यवर्ती सहाय्य दिले. भारत सरकारने राज्य शासनाला पर्यावरण (संरक्षण ) अधिनियम १९८६ च्या कलम ५ अन्वये दिनांक १७.०५.१९८८ च्या परिपत्रकानुसार अधिकार दिले आहेत. या अधिकारान्वये कोणत्याही प्रदुषण करणा-या अथवा पर्यावरणाचा धोका उत्पन्न करण्याच्या प्रकल्पावर कारवाई करता येते.

**१७. पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र (एन्वीस)**

एन्वीस ही १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना असून या योजने अंतर्गत पर्यावरण विषयक माहितीचा माहाजाल विकसीत करण्यात येत आहे. या योजनेत मुख्यत्वे पर्यावरणाशी निगडीत विविध क्षेत्रातील शास्त्रीय माहीतीचे संकलन करुन ती विविध मार्गानी जनसामान्यापर्यंत पोहचविणे असा असून, त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेणारे ईंजिनिअर्स, शास्त्रज्ञ व सामान्य जनता इत्यादी पर्यंत अचूक माहिती योग्य वेळेत उपलब्ध होऊ शकेल.

राज्याचे एन्वीस केंद्र मार्च २००३ पासून कार्यान्वित असून या केंद्राने संपूर्ण पर्यावरण विषयक माहितीवर आधारीत http://envis.maharashtra.gov.in हे संकेत स्थळ विकसित केले आहे.

या संकेत स्थळावर पर्यावरण विषयक सद्यःस्थिती अहवाल, पर्यावरण विषयक मुलभत माहिती, कायदे, योजना, पर्यावरण विषयक बातम्यांचा साठा, ई-ग्रंथालय, स्लाईड शो, छायाचित्र दालन, चर्चा दालन, तक्रार निवारण प्रणाली, पर्यावरण शिक्षण, मुलांसाठी प्रश्नमंजुषा आणि विविध संदर्भित पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले आहे.

एन्व्हिस-

सन २००९-१० मध्ये एन्व्हिस केंद्रामार्फत पर्यावरण पूरक पध्दतीने सणांचे साजरीकरण करण्याची संकल्पना जनमानसात रूजवण्याकरीता पर्यावरण पूरक होळी/रंगपंचमी बाबत जागृती करून मंत्रालयीन परिसरात नैसर्गिक रंग उपलब्ध करून देण्यात आले. तसेच पर्यावरण दिन ५ जून चे औचित्य साधून राज्यस्तरीय निबंध, लेख घोषवाक्य व छायाचित्र स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेस राज्यभरातून शहरी तसेच ग्रामिण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व विजेत्या स्पर्धकांचा बक्षिस वितरण सोहळा मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ५ जून रोजी करण्यात आला. स्पर्धेचा प्रतिसाद बघता विजेत्या प्रवेशिका सर्वापर्यंत पोहचविण्यासाठी जनमानसातील पर्यावरण या संकलिकेद्वारे प्रकाशित करण्यात आला.

एन्व्हिस संकेतस्थळावरील ग्रीन कॅलेंडर या सदराखाली पर्यावरणविषय विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनाविषयी तसेच पर्यावरणपूरक सणाविषयी महत्वपूर्ण व उपयुक्त माहिती सर्वांना अपलब्ध करून देण्यात आली.

## १८. राज्य सरोवर संवर्धन योजना

तलाव हे भूजलाची पातळी वाढविण्यासाठी, जैव विविधता आणि स्थनिक सूक्ष्म हवामानाचा समतोल राखण्यासाठी तसेच,पिण्याचे पाणी, मासेमारी, मनोरंजन आणि पूर नियंत्रण यासाठी उपयोगी ठरतात. ही उपयुक्तता लक्षात घेऊन राज्य शासनाने तलाव संवर्धनासाठी राज्यस्तरीय योजनद्वारे निधी उपलब्ध करून दिला आहे. या योजनंतर्गत यमाई तलाव, पंढरपूर, हनूमान तलाव, काटोल, शालेट तलाव,माथेरान हे प्रकल्प २००७ पासून हाती घेण्यात आले असून त्यांची कामे वेळापत्रकानूसार प्रगतीपथावर आहेत. तसेच सन २००८ वर्षात डेडरगाव तलाव, धुळे येथील प्रकल्पास मंजूरी देण्यात आली आहे.

## १९. हरित प्रकल्पांसाठी आवाहन (Call for Green Ideas)

पर्यावरण संवर्धनात कायदा व नियमांच्या अनुपालनाबरोबरच जनतेच्या सहभागाचे अनन्यसाधारण महत्व आहे. या कामात जनसहभाग वाढविण्यासाठी पर्यावरण विषयक जनजागृती मोठयाप्रमाणावर करणे काळाची गरज आहे. म्हणूनच पर्यावरण संवर्धनात राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०१० च्या जागतिक पर्यावरण दिनी, पर्यावरण विभागामार्फत "Call for Green Ideas" ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास सुरुवात झाली. या योजनेद्वारे राज्य भरातून शहरी, ग्रामीण, तटीय व आदिवासी भाग पश्चिम घाटासह, भागातील पर्यावरणीय समस्यांशी निगडीत कार्यक्रम जसे स्थानिक पर्यावरणीय समस्या जल प्रदूषण, पर्यावरणपूरक सण, घनकचरा व्यवस्थापन, जैवविविधता संर्वधन तर प्रकल्प अंमलबजावणी यात नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, संरक्षण आणि व्यवस्थापन, इको व्हिलेज आणि इतर विषयांवर आधारित लोकसहभाग असलेले विविध प्रस्ताव मागविण्यात आलेले आहे. प्रकल्पांची निवड ही प्रकल्पांचे नाविण्य, फलनिष्पत्ती, स्वयंसिध्दता, इतरत्र वापरक्षमता व योजनेचे कार्यक्षेत्र (शहरी /ग्रामीण/ आदिवासी) या बाबींवर अवलंबून आहे.

राज्य भरातून एक ते पाच फेरीसाठी एकूण प्राप्त ३६६ प्रस्तावांची सुकाणू समितीमार्फत छाननी करण्यात येवून पर्यावरण विषयक जनजागृती तसेच प्रकल्पांची अंमलबजावणी या दोन श्रेणीतील निवडक २५ नाविन्यपूर्ण प्रस्तावांची निवड करण्यात आली. यात जादूच्या मनोरंजनात्मक कार्यक्रमांद्वारे शालेय विद्यार्थी व लोकांमध्ये जनजागृती, सार्वजनिक स्वच्छतागृहात सौर उर्जेचा वापर, सागरतटीय क्षेत्रातील कासवांचे संवर्धन असे महत्वाचे प्रकल्प या योजनेद्वारे निवडण्यात आले आहेत.

## २०. पर्यावरण सेवा योजना -

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये लहानपणीच पर्यावरण संवर्धनाची बीजे बिंबवण्यासाठी व पर्यावरणपूरक संवेदनशील भावी पिढीच्या निर्मितीसाठी, पर्यावरण शिक्षण निसर्गाच्या सानिध्यात जावून प्रत्यक्ष कृतीच्या आधारे मुलांना समजावून सांगण्याच्या उद्देशाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना राबविण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात सदर योजना पहिल्या टप्प्यामध्ये पुणे, सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, औरंगाबाद, जालना, नागपूर, चंद्रपूर, नाशिक, जळगांव, रत्नागिरी व ठाणे या बारा जिल्हयामधील एकुण पन्नास इच्छुक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. केंद्रिय पर्यावण व वन मंत्रालयामार्फत सेंट्रल फॉर एक्सलन्स यांनी नियुक्त केलेले पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE), पुणे ही संस्था राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था म्हणून या योजनेसाठीची अंमलबजावणी करत आहे. निसर्ग व मानव यातील नातेसंबंध समजून घेवून स्थानिक पर्यावरणाशी निगडीत विविध समस्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे समजावून घेवून स्थानिक पातळीवर नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाबाबत स्थानिक लोकांच्या सहभागाने प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे.

## पर्यावरण विभागातील अधिकारी त्यांचे पदनाम व दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| श्रीम. वल्सा नायर सिंह<br>सचिव (पर्या) | दू.क्र.०२२-२२ ८७ ३८ ४५<br>दू.क्र.०२२-२२ ८१ ३५ ७५<br>फॅ.क्र.०२२-२२ ८१ ३९ ४७ |
| डॉ. बी. एन. पाटील,<br>संचालक (पर्यावरण)<br>निवास/मोबाईल | दू.क्र.०२२-२२ ८५ ५० ८६/विस्तार ३१३६<br>दू.क्र.०२२-२५ ६५ १२७ ८३<br>मो.क्र. ९८६९९४२३९५ |
| श्री.श्या.ना. धकाते<br>सह सचिव (आस्थापना)<br>निवास | दू.क्र.०२२-२२ ०२ ९३ ८८/विस्तार ३१३५<br>दू.क्र.(निवासी) ०२२-२६ ४५ ५२ ७५ |
| श्री. सो. ना. बागुल<br>उपसचिव (तांत्रिक कक्ष -२)<br>निवास/मोबाईल | दू.क्र.०२२-२२ ८१ ९५ १७/विस्तार ३१३५ |
| डॉ.बी.एन.पाटील,<br>शास्त्रज्ञ श्रेणी-१<br>निवास/मोबाईल | दू.क्र.०२२-२२ ८५ ५० ८२/विस्तार ३१३४<br>मो.क्र.९८६९९४२३९५ |
| शास्त्रज्ञ श्रेणी-१<br>निवास/मोबाईल | दू.क्र.०२२-२२ ८५ ४७ ०७ /विस्तार ३१३३<br>मो.क्र.९६१९६४८३९५ |
| श्री. दे. के. मानकर<br>अवर सचिव (आस्था) | दू.क्र.०२२-२२ ८७ ३८ ४४/<br>विस्तार ३१३१/३१३५ |
| श्री. अ. र. परशुरामे<br>अवर सचिव (तां.क.३) | दू.क्र.०२२-२२ ८७ ३८ ४४/विस्तार ३१३५ |
| श्री. दि. मा. सोनवणे<br>शास्त्रज्ञ श्रेणी-२ (तां.क.१/तां.क.४) | दू.क्र.०२२-२२ ८७ ३८ ४४/विस्तार ३१३५ |
| श्री. र. ल. लखोटे<br>कक्ष अधिकारी (तां.क.२) | दू.क्र.०२२-२२ ८१ ९५ १७/विस्तार ३१३५ |
| कार्यालय दूरध्वनी क्र. व<br>फॅक्स क्र. | दू.क्र.०२२-२२८७३८४४<br>फॅ.क्र.०२२-२२०२ ५९ ४६ |
| विभागातील पर्यावरण विषयक<br>संकेतस्थळांची नावे | http://ec.maharashtra.gov.in<br>http://envis.maharashtra.gov.in<br>http://mczma.maharashtra.gov.in<br>http://mahaenvis.nic.in |
| विभागाचे संकेतस्थळ<br>Email Address (पत्ता) : | environmentdepartment@gmail.com |

# पर्यावरण विभाग

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अमंलबजावणीकरिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची कार्यासन निहाय माहिती.

| कार्यासन -३ (संपूर्ण प्रशासन शाखा) | तांत्रिक कक्ष : १ | तांत्रिक कक्ष : २ | तांत्रिक कक्ष-३ | तांत्रिक कक्ष-४ |
|---|---|---|---|---|
| श्री. श्या. ना. धकाते सह सचिव तथा अपिलीय प्राधिकारी | डॉ. भ. ना. पाटील संचालक तथा अपिलीय प्राधिकारी | श्री. सो. ना. बागुल उप सचिव तथा अपिलीय प्राधिकारी | श्री. अ. र. परशुरामे शास्त्रज्ञ श्रेणी-१ तथा अपिलीय प्राधिकारी | श्री. दि. म. सोनवणे शास्त्रज्ञ श्रेणी-१ तथा अपिलीय प्राधिकारी |
| श्री. दे. के. मानकर अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी | श्री. दि. मा. सोनवणे शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. र. ल. लखोटे कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी | श्री. अ. परशुरामे शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. दि. मा. सोनवणे शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी |
| श्री. ध. ना. देव सहायक तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. हि. सा. पेडणेकर सहायक तथा सहायक माहिती अधिकारी | श्री.रा.म. कारखानीस सहायक तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. सु. ज. शेट्टी सहायक तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. उ. बा. काण्णव सहायक तथा सहायक माहिती अधिकारी |

## पर्यावरण विभागातील पदे व वेतन श्रेणी

| पदनाम (१) | वेतनश्रेणी (२) | पदांची संख्या (३) |
|---|---|---|
| राजपत्रित | | |
| सचिव | ३७,४००-६७,००० | १ |
| सह सचिव | ३७,४००-६७,००० | १ |
| उप सचिव | १५,६००-३९,१०० | १ |
| अवर सचिव | १५,६००-३९,१०० | १ |
| वरीष्ठ स्वीय सहायक | १५,६००-३९,१०० | १ |
| कक्ष अधिकारी | ९,३००-३४,८०० | १ |
| अराजपत्रित | | |
| निवडश्रेणी लघुलेखक | ९,३००-३४,८०० | १ |
| उच्चश्रेणी लघुलेखक | ९,३००-३४,८०० | १ |
| निम्नश्रेणी लघुलेखक | ९,३००-३४,८०० | १ |
| सहायक | ९,३००-३४,८०० | ५ |
| रोख लेखापाल | ९,३००-३४,८०० | १ |
| सर्वसाधारण कार्यलिपिक | ५,२००-२०,२०० | ४ |
| रोखपाल | ५,२००-२०,२०० | १ |
| टंकलेखक | ५,२००-२०,२०० | २ |
| वाहन चालक | ५,२००-२०,२०० | १ |
| वर्ग-ड | | |
| चक्रमुद्रण यंत्रचालक | ४,४४०-७,४४० | १ |
| झेरॉक्स चालक | ४,४४०-७,४४० | १ |
| शिपाई | ४,४४०-७,४४० | ४ |
| | **तांत्रिक कक्ष** | |
| राजपत्रित | | |
| संचालक | ३७,४००-६७,००० | १ |
| शास्त्रज्ञ श्रेणी-१ | १५,६००-३९,१०० | २ |
| शास्त्रज्ञ श्रेणी-२ | १५,६००-३९,१०० | ६ |
| अराजपत्रित | | |
| सहायक | ९,३००-३४,८०० | २ |
| उच्चश्रेणी लघुलेखक | ९,३००-३४,८०० | १ |
| निम्नश्रेणी लघुलेखक | ९,३००-३४,८०० | २ |
| सर्वसाधारण कार्य लिपिक | ५,२००-२०,२०० | ३ |
| वर्ग-ड | | |
| शिपाई | ४,४४०-७,४४० | २ |

(शा. म. मु.) वाय ५७५—६ (२,५००—०-११)

## २. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

## 2. Maharashtra Pollution Control Board, Mumbai

प्रस्तावना :

१. **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ :—**

महाराष्ट्र जल प्रदूषण प्रतिबंध अधिनियम, १९६९ च्या अन्वये महाराष्ट्र जल प्रदूषण नयंत्रण मंजळाची स्थापना १९७० झाली. ह्या अधिनियमाऐवजी महाराष्ट्रात १ जून १९८१ पासून केंद्रीय जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ स्विकारला गेला. त्यामुळे या मंडळाला अधिक अधिकार प्राप्त झाले. १९७४ चा अधिनियम स्विकारल्यानंतर ह्या मंडळानचे जल प्रदूषण (प्रतिबंध व नियमत्रण) मंडळ हे नाव बदलून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ असे टेवण्यात आले. त्यानंतर १६ मे १९८१ पासून हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ लागू करण्यात आला.

मंडळाची कार्ये :

